## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६/२०२५

सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय ०९–०००३४३–२०२५

## निशाणी क्र.१ वरील आदेश

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायद्याच्या कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

## अर्जदाराच्या अर्जाचे कथन थोडक्यात खालील प्रमाणेः–

०२. अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ व ३, गैरअर्जदार यांचे वडील कै.सदानंद पांडुरंग बांदकर यांचा मृत्यू दि.२०/११/२०२३ रोजी मु.पो. जामसंडे–मळई येथे झाला. कै.सदानंद पांडुरंग बांदकर यांच्या मालकीचे एम.एच.०७ ए.जी. ६०६३ या नोंदणी क्रमांकाचे मारुती सुझुकी कंपनीचे वॅगन–आर या प्रकारातील चार चाकी वाहन होते. सदर वाहनाचा वापर ते वैयक्तिक उपयोगाकरिता करीत असत. त्यांच्या मृत्यूपश्चात सदरचे वाहन हे अर्जदार यांचे ताब्यात आहे. सदरचे वाहन हे कै.सदानंद पांडुरंग बांदकर यांच्या नावे नोंद असल्याने सदर वाहनाचा वापर करणे, विमा उतरवणे अथवा वाहनाची विक्री करणे इ. करिता अर्जदार यांना अडचणी येत आहेत. सबब, सदर वाहन अर्जदार यांनी स्वत:चे नावे करुन घेणे करिता उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सिंधुदुर्ग, ओरोस येथे विचारणा केली असता त्यांनी सक्षम न्यायालयाचा वारस दाखला आवश्यक असल्याचे तोंडी कळविले. कै.सदानंद पांडुरंग बांदकर यांनी मृत्युपुर्वी कोणतेही मृत्यूपत्र अथवा तत्सम दस्तऐवज लिहून ठेवला नाही. अर्जदार व गैरअर्जदार हेच कै.सदानंद पांडुरंग बांदकर यांचे कायदेशिर वारस आहेत व त्यांचे व्यतिरीक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सबब, अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०३. न्यायालयाने अर्जदारामार्फत दैनिक वृत्तपत्र प्रहार या वर्तमान पत्रामध्ये दि.०७/०८/२०२५ रोजी जाहीर प्रगटन निशाणी क्र.२० प्रमाणे प्रसिध्द केले होते व हरकती मागवल्या होत्या. परंतु, जाहीर प्रगटन प्रसिध्द होवून देखील कोणीही, कोणत्याही प्रकारे, कोणतीच हरकत अर्जदाराच्या अर्जाला घेतलेली नाही. अर्जदार यांनी निशाणी क्र.१८ येथे पुरशीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

०४. गैरअर्जदार यांनी निशाणी क्र.१६ येथे पुरशीस दाखल करुन अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यास त्यांची हरकत नाही असे कथन केले आहे. गैरअर्जदार यांनी निशाणी क्र.१९ येथे पुरशीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

०५. अर्जदार क्र.१ स्मिता सदानंद बांदकर यांनी त्यांचे शपथपत्र निशाणी क्र.१७ प्रमाणे दिले आहे. अर्जदार क्र.१ यांनी आपल्या शपथपत्रामध्ये अर्जातील कथनांचा पुर्नउल्लेख करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. अर्जदार यांनी निशाणी क्र.५ येथे कै.सदानंद पांडुरंग बांदकर यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे.

०६. निशाणी क्र.२० चे जाहिर प्रगटन प्रसिध्द करुन देखील कोणीही आजपर्यंत कोणत्याही प्रकारे अर्जदार यांच्या अर्जाला कोणताच आक्षेप नोंदवलेला नाही. अर्जदार यांनी केलेला अर्ज, दिलेला पुरावा, दाखल केलेली कागदपत्रे व वरील कारणावरुन अर्जदार यांनी केलेला अर्ज सिध्द झालेला आहे. त्यामुळे, अर्जदार क्र.१ ते ३ व गैरअर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब, अर्जदार यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ स्मिता सदानंद बांदकर, अर्जदार क्र.२ दिप्ती सदानंद बांदकर लग्नानंतर स्वरा सागर मोंडकर, अर्जदार क्र.३ प्राजक्ता सदानंद बांदकर व गैरअर्जदार सौदामिनी सदानंद बांदकर लग्नानंतर अवनी अमोल बुरटे हे मयत सदानंद पांडुरंग बांदकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत त्यांना वारस प्रमाणपत्र (लिगल हेअरशिप सर्टिफिकेट) देण्यात यावे.

३. सदर प्रमाणपत्र अपेंडीक्स बी प्रमाणे देण्यात यावे.

४. अर्जदार यांनी नियमाप्रमाणे लागणारी कोर्ट फी न्यायालयात जमा करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.04.01 16:54:22 +0530

( श्रीकांत एस. पचंडी)
दिनांकः ०१/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, देवगड